


कामगार दिन



लेखक : जेफ्री स्कॉट
चित्रं : चेरी आर वायमन





कामगार दिन

लेखक : जेफ्री स्कॉट
चित्रं : चेरी आर वायमन




दरवर्षी सप्टेंबरमधल्या पहिल्या सोमवारी
आपण कामगार दिवस साजरा करतो.
कामगार दिवस म्हणजे उन्हाळ्याचा शेवट.
अमेरिकेत सर्वत्र हा दिवस साजरा केला जातो.
पण याला कामगार दिन का म्हणतात?
आणि आपण नक्की काय साजरं करतो?

आधी कामगार दिवस नव्हता.
पूर्वी हा सुट्टीच्या दिवसांमध्ये
सामीलही नव्हता.
कामगार दिवस पहिल्यांदा
केवळ १०० वर्षांपूर्वी साजरा केला गेला.

तेव्हा त्याला कामगार दिवस म्हणत नव्हते.
तो देशभर साजरा होत नव्हता,
फक्त न्यूयॉर्कमध्ये साजरा व्हायचा.





कामगार म्हणजे काम करणारे.
१८८२ मध्ये न्यूयॉर्क शहरात
अनेक प्रकारचे कामगार होते.



सुतार



विटा रचणारे



फर्निचर बनवणारे

छापखान्यातले



सगळ्यांना आपलं काम आवडत होतं.
आपल्या कौशल्याबद्दल आणि

ते तयार करत असलेल्या वस्तूंबद्दल
त्यांना अभिमान होता.

पण अनेक गोष्टी अशा होत्या

ज्या त्यांना आवडत नव्हत्या

अनेकांना जास्त तास काम करावं लागायचं.

अनेकजण दिवसाला १२ ते १४ तास काम करायचे

त्यांना आठवडी सुट्टी पण नव्हती

ते सहा किंवा कधीकधी सात दिवस

आठवड्याभरात काम करायचे

अनेकदा त्यांचं कामाचं ठिकाण सुरक्षित नसायचं

आज जर तुम्ही दिवसाला १२ तास

आठवड्यात ६ दिवस, धोकादायक ठिकाणी

काम केलं तर तुम्हाला चिक्कार पैसे मिळतील

पण १८८२ मध्ये

तसं नव्हतं

कामगारांना खूप कमी वेतन मिळायचं

त्यांना वेतन कमी असल्यामुळे त्यांच्या लहान मुलांना कामावर जावं लागायचं. ११ किंवा १२ वर्षांची मुलं कामावर जाताना सर्रास दिसायची.



ती मुलं कारखान्यात कापडांचे जड तागे उचलायचं काम दिवसातून १० तास करायची.

किंवा आठवड्याचे सहा दिवस कोळशाच्या खाणीत काम करायची.



सगळेच कामगार यावर नाराज होते. पण एका माणसानं ती व्यवस्था बदलणंही अशक्य होतं.

मग १८८० मध्ये

न्यूयॉर्कमधल्या कामगारांनी

क्राफ्ट युनियन्स नावाची संघटना सुरु केली

खूप कामगार एकत्र आले तर

गोष्टी कदाचित बदलू शकले असते

जे एकट्यादुकट्याचं काम नव्हतं

सुरुवातीला प्रत्येक कौशल्याची एक संघटना होती

विटा उचलणार्‍यांची एक संघटना होती.

सुतारांची एक संघटना होती

अशा अनेक छोट्या संघटना

नंतर एकत्र आल्या


त्यांनी एक मोठी संघटना स्थापन केली

तिचं नाव होतं सेंट्रल लेबर युनियन

सी.एल.यु. त्याहीपेक्षा एका मोठ्या

संघटनेचा भाग होती





त्या मोठ्या संघटनेचं नाव होतं

द नाईटस आॉफ लेबर

द नाईटस आॉफ लेबर

प्राचीन काळी योध्दे जसे लढायचे तसा लढा द्यायची

पण आता ते तलवारीनं लढत नव्हते

द नाईटस आॉफ लेबर

शब्द आणि मतं यावर लढत होती

ते लहान मुलांनी कारखाने

आणि खाणींमधून बाहेर पडावं यासाठी लढायचे

ते योग्य वेतनासाठी लढायचे

ते कामाचं ठिकाण सुरक्षित असावं यासाठी लढायचे



न्यूयॉर्कमधले कितीतरी कामगार

अमेरिकेत जन्मलेले नव्हते

ते किंवा त्यांचे पालक

इतर देशांमधून आले होते

त्यांच्या मूळ देशात

कामगारांसाठी सुट्ट्यांचे दिवस होते

प्रत्येक कौशल्यासाठी एक दिवस असायचा

सुतारांचा एक दिवस असायचा

वीटकामगारांचा एक दिवस असायचा

छपाई कामगारांचा एक दिवस असायचा

सुट्टीचा दिवस

म्हणून तो दिवस मिळायचा

त्या दिवशी ते सहलीला जायचे

आपलं काम किती महत्वाचं आहे

हे दाखवण्यासाठी संचलन करायचे







अमेरिकेत मात्र कामगारांना सुट्ट्या नव्हत्या.

न्यूयॉर्कमधले असंख्य कामगारांना आधीचे दिवस

आठवायचे.

या नवीन देशातही त्यांना

कामगारांसाठी सुट्टीचा एक दिवस हवा होता.

त्यांनी सेंट्रल लेबर युनियनला हे कळवलं.

१४ मे १८८२ रोजी न्यूयॉर्क शहरातल्या

सी एल यु संघटनेनं कामगारांचा

भव्य मेळावा आयोजित करायचं ठरवलं.

हा सप्टेंबरमध्ये घेता येऊ शकला असता.

तेव्हा वातावरण उबदार असणार होतं.

४ जुलै आणि थॅंक्सगिव्हिंगच्या दरम्यान

सुट्टी असू शकली असती.

यात एक संचलन आणि सहल

आयोजित केली होती.

प्रत्येकजण त्यात सामील होणार होते.

आपल्या कामाबद्दल त्यांना अभिमान वाटतो

हे त्यांना दाखवता येणार होतं.

आपल्या कामाच्या ठिकाणाबद्दलचा रागही

व्यक्त करता आला असता.

या मेळाव्याची संकल्पना कोणी मांडली ते अज्ञात

आहे.

काहीजण म्हणतात, न्यूयॉर्कमधला एक कामगार

पीटर जे मॅग्वायर यानं ती कल्पना मांडली.



काहीजण म्हणतात, मॅथ्यु मॅग्वायर यानं ती कल्पना

मांडली. तो न्यू जर्सीतला कामगार होता.

या दोघांनीही मेळाव्यासाठी भरपूर

श्रम घेतले हे नक्की.





मेळाव्याच्या योजना तयार झाल्या. सहलीसाठी बाग निवडली गेली.

पोलिसांकडून संचलनाची परवानगी युनियननं मिळवली. अखेर मेळाव्याची तारीख ठरली.

५ सप्टेंबर १८८२

११ जून १८८२ पर्यंत

सी एल यु नं मेळाव्याची २०००० तिकिटं पाठवली होती.

सगळी तयारी झाली होती.

प्रश्न एकच होता,

कोणी येईल का?



अमेरिकेत त्याआधी असा प्रसंग घडला नव्हता.

लोक नवीन काहीतरी करायला

घाबरतील का?

आपली नोकरी गमवायची

त्यांना भीती वाटेल का?



जुलै संपला. आॉगस्टही उलटला.

तरीही अनेक क्राफ्टच्या कामगारांनी

मेळाव्याबद्दलची उपस्थिती कळवली नव्हती.

मेळावा यशस्वी होणार का व्यर्थ जाणार?

कोणालाच खात्री नव्हती.

अखेरीस ५ सप्टेंबरला सकाळी १०.३० वाजता

संचलनासाठी कामगार रांगेत उभे राहिले.

त्यांचा नेता होता विल्यम मकाबे.

तो सी एल युचा नेता होता.

तो एका घोड्यावर बसला होता.

तो संचलनात आघाडीवर होता.


मात्र त्यानं संचलनात सामील होणार्‍यांकडे नजर

टाकली

आणि तो निराश झाला.

फक्त मूठभर कामगार जमले होते.





अर्थात मकाबेनं संचलन चालू केलं.

पण कामगार मेळावा

अपयशी ठरला

खरं तर ट्रॅफिस संचलनासाठी थांबतं

पण हे संचलन छोटंसंच होतं


त्यांच्यासाठी कोणीच थांबलं नाही

कामगारांना गाड्या आणि वॅगन्सच्या

मधून वाट काढावी लागत होती

मकाबेला ते छोटं संचलन

चालू रहाण्यासाठी बरेच कष्ट पडले







अचानक संचलनातल्या कामगारांना संगीत ऐकू आलं.

ते शेजारच्या रस्त्यावरुन ऐकू येत होतं.

संगीताचा आवाज वाढतच गेला.

कोण असावं बरं?

ते दागिने बनवणारे कामगार होते – २०० जण

ते संचलनात सामील व्हायला आले होते

त्यांनी स्वत:चा बँड सोबत आणला होता

त्या संगीतानं सगळ्यांचं मनोधैर्य उंचावलं

काही वेळानंतर विटकामगार सामील झाले.

त्यांनीही बँड आणला होता.


बॅडमागोमाग काही घोडागाड्या आल्या.

घोडागाड्यांमध्ये विटा, भिंती, खिडक्यांच्या

चौकटीच्या प्रतिकृती होत्या.

विटकामगारांना आपल्या कामाचा अभिमान होता.

त्यांना आपलं काम सगळ्यांना दाखवायचं होतं.



लवकरच कामगार घोळक्यानं सामील होत गेले.

काहीजणांनी संचलन घराजवळून जाईल

तसं सामील व्हायचं ठरवलं होतं.

काहीजणांना उशीर झाला होता.

संचलनातले कामगार वाढत गेले.

ग्रँड मार्शल मकाबे आता घोड्यावरुन

१०,००० कामगारांचं नेतृत्व करत होता

अनेक बँडस मोठ्या आवाजात वाजत होते


ट्रॅफिक थांबलं होतं

हजारो लोक

संचलन पहात होते

ते आरोळ्या ठोकून प्रोत्साहन देत होते

रुमाल हलवत होते.





कित्येक कामगारांनी कामावर जायचाच

पोशाख घातला होता.

यंत्रावर काम करणार्‍यांनी एप्रन घातले होते.

सुतारांनी हत्यारांचा बेल्ट लावला होता.

छपाई कामगारांनी कागदी टोप्या घातल्या होत्या.


अनेकांनी हातात फलक धरले होते.

त्यावरच्या मजकुरामुळे कामगारांना

कोणता बदल हवा आहे हे लोकांना कळणार होतं.

तास कमी

वेतन जास्त



बालमजुरी

बंद करा !

संचलनानंतर

संचलनकर्ते आपापल्या कुटुंबाला घेऊन

एल्म पार्ककडे गेले

सुमारे ५०,००० लोक त्या पार्कमध्ये जमले होते

प्रत्येकानं सहलीसाठी डबा आणला होता

भाषणकर्त्यांनी

कामगारांचं महत्व मांडलं

संघटना कशा चालू करायच्या ते सांगितलं

त्यांनी

बालमजुरी कशी बंद करायची ते सांगितलं

भाषणांनंतर बँड वाजायला लागला

जमलेले सर्वजण गायला, नाचायला लागले

फटाके फोडले गेले

एका महत्वाच्या भव्य समारंभाचा

असा भव्य शेवट झाला.



अशा रीतीनं १८८२ मध्ये पहिला कामगार दिवस

सुरु झाला.

कोणीच येणार नाही असं नेत्यांना वाटत होतं.



पण तो दिवस संपला तेव्हा,

तो एक यशस्वी प्रयोग असल्याचं

त्यांच्या लक्षात आलं.

त्यांच्या एक गोष्ट मात्र लक्षात आली नव्हती.

त्यांनी एक राष्ट्रीय सुट्टी सुरु केली होती.

अमेरिकेतल्या सर्व कामगारांना

कामगार दिवसाची सुट्टी ही कल्पना आवडली होती.

त्यामुळे ती कल्पना पसरत गेली.

१८८९ पर्यंत अमेरिकेतल्या ४०० शहरांमध्ये

न्यूयॉर्कप्रमाणे कामगार दिवस सुरु झाला.

अनेक राज्यांनी कामगार दिवसाचा कायदा संमत केला.

ओरेगॉन त्यात आघाडीवर होतं.

कोलोरॅडो, न्यू जर्सी, न्यूयॉर्क आणि मॅसॅच्युसेटसनं

तोच मार्ग आक्रमला.

१९३० पर्यंत अमेरिकेतल्या सर्व राज्यांमध्ये

कामगार दिवस साजरा व्हायला लागला.



कामगार दिवस जसा सुरु झाला

तसे कामगारांचे प्रश्न सुटायला लागले

बालमजुरीविरुध्द कायदे संमत झाले

कामाचे तास कमी झाले

कामगारांचं बरोबर होतं

संघटनेत एकत्र येऊन

गोष्टी बदलू शकत होत्या

एकट्यानं प्रयत्न करुन

या गोष्टी कधीच साध्य झाल्या नसत्या .





आजच्या कामगारांपुढे नवीन समस्या आहेत.

कारखाने पूर्वीपेक्षा जास्त सुरक्षित आहेत.

पण नवीन यंत्रं सुरक्षेचे नवीन प्रश्न उभे करतात.

त्यामुळे संघटना जोमानं काम करत राहिल्या

ज्यायोगे सदस्यांसाठी कारखाने सुरक्षित राहतील

कामगारांना योग्य वेतन मिळेल

याची संघटना खातरजमा करतात.

संघटना त्यांच्या सदस्यांना

अनेक प्रकारे मदत करतात.



आपण अमेरिकन कामगारांच्या सन्मानासाठी

कामगार दिवस साजरा करतो.

त्यांनी देश समर्थ व्हावा

यासाठी किती प्रयत्न केले याची जाणीव ठेवतो.

आणि कोणतंही काम करत असला

तरी प्रत्येक कामगार किती महत्वाचा आहे

हे आपण लक्षात ठेवतो.



समाप्त

